IIPIMRJ IIP International Multidisciplinary Research Journal

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 03 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# लोकशाही व्यवस्थांसमोरील समकालीन जागतिक आव्हाने

[1]प्रा. डॉ. हनुमंत विश्वनाथ फाटक, [2]कु. कल्पना पंडितराव कांबळे

[1]तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

[2]संशोधक विद्यार्थीनी, के.जे. सोमैया कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कोपरगांव.

**Article Info**

***Article History:***
Received: 24th January 2026
Accepted: 01st February 2026
Published: 05th February 2026

***Keywords:***

*लोकशाही*

**ABSTRACT**

लोकशाही ही आधुनिक जगातील सर्वाधिक स्वीकारली गेलेली शासनपद्धती मानली जाते; तथापि, २१व्या शतकात तिच्यासमोर अनेक गुंतागुंतीची जागतिक आव्हाने उभी राहिली आहेत. जागतिकीकरण, वाढती आर्थिक असमानता, तंत्रज्ञानाचा प्रभाव, सामाजिक ध्रुवीकरण, मानवी हक्कांचे उल्लंघन आणि हवामान बदल यांसारख्या घटकांमुळे लोकशाहीच्या गुणवत्तेवर आणि स्थैर्यावर परिणाम होत आहे. या संशोधन लेखामध्ये लोकशाहीवरील विश्वासातील घट, मानवी हक्कांचे संरक्षण, आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर धोरणनिर्मिती या विषयांचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे. विविध देशांच्या उदाहरणांच्या आधारे लोकशाही व्यवस्थेची सध्याची स्थिती आणि भविष्यातील आव्हाने स्पष्ट करण्यात आली आहेत. तसेच लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक धोरणात्मक उपायांची रूपरेषा मांडण्यात आली आहे.

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: February 02, 2026
Similarity Index: 6%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Phatak, H. V., & Kamble, K. P. (2026).** लोकशाही व्यवस्थांसमोरील समकालीन जागतिक आव्हाने. *IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 3(1), 651–655.*

## ❖ प्रस्तावना :-

लोकशाही ही जनतेच्या सहभागावर आधारित शासनप्रणाली असून ती आधुनिक राजकीय व्यवस्थेचा केंद्रबिंदू मानली जाते. लोकशाही केवळ निवडणुका घेण्यापुरती मर्यादित नसून ती कायद्याचे राज्य, सत्ताविभाजन, स्वतंत्र न्यायव्यवस्था, मुक्त प्रसारमाध्यमे, मानवी हक्कांचे संरक्षण आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग या तत्त्वांवर आधारलेली असते. २१व्या शतकात जागतिकीकरण, तंत्रज्ञानाचा झपाट्याने वाढणारा प्रभाव, आर्थिक विषमता, सामाजिक ध्रुवीकरण आणि पर्यावरणीय संकटे यांमुळे लोकशाही व्यवस्थांसमोर नवे आणि गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले आहेत. अनेक देशांमध्ये लोकशाही संस्थांवरील लोकांचा विश्वास कमी होत असल्याचे दिसते. काही ठिकाणी मानवी हक्कांचे उल्लंघन, माध्यमांवरील निर्बंध आणि सत्तेचे केंद्रीकरण वाढताना दिसते. याशिवाय हवामान बदलासारख्या जागतिक समस्यांमुळे शासनाच्या धोरणक्षमतेची कसोटी लागली आहे. Intergovernmental Panel on Climate Change (IPCC) च्या अहवालांनुसार हवामान बदलाचा सामाजिक आणि आर्थिक स्थैर्यावर गंभीर परिणाम होत आहे. त्यामुळे लोकशाही व्यवस्थांनी पर्यावरणीय न्याय आणि शाश्वत विकास यांचा समतोल साधणे आवश्यक झाले आहे.तसेच मानवी हक्कांच्या संदर्भात United Nations च्या विविध अहवालांत अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संघटन स्वातंत्र्य आणि न्यायप्रवेश या बाबींवर वाढत्या मर्यादांची नोंद करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर लोकशाहीची गुणवत्ता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व टिकवणे ही मोठी जबाबदारी ठरते.

## ❖ संशोधनाची उद्दिष्टे:-

या संशोधनाचे मुख्य उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:

1) लोकशाहीवरील लोकांचा विश्वास कमी होण्यामागील सामाजिक, आर्थिक व राजकीय घटकांचा अभ्यास करणे..
2) मानवी हक्कांचे उल्लंघन लोकशाहीच्या गुणवत्तेवर कसा परिणाम करतो याचे विश्लेषण करणे.
3) हवामान बदल आणि लोकशाही धोरणनिर्मिती यांच्यातील संबंध स्पष्ट करणे.

## ❖ सामाजिक कारणे:-

लोकशाहीवरील लोकांचा विश्वास कमी होण्यामागे सामाजिक कारणांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. समाजातील असमानता आणि सामाजिक दुभंग हे त्यातील प्रमुख घटक आहेत. जात, धर्म, वंश, भाषा किंवा प्रादेशिक ओळख यांच्या आधारावर समाजात विभागणी निर्माण झाल्यास सामाजिक ऐक्य कमी होते आणि परस्पर अविश्वास वाढतो. जेव्हा या ओळखी राजकीय साधन म्हणून वापरल्या जातात तेव्हा ध्रुवीकरण तीव्र होते. उदा., भारतामध्ये जात व धर्माधारित राजकारणामुळे निवडणुकांमध्ये मतांचे ध्रुवीकरण वाढले आहे तर अमेरिके मध्ये वांशिक प्रश्नांवरून निर्माण झालेल्या तणावामुळे राजकीय मतभेद तीव्र झाले आहेत. अशा परिस्थितीत लोकशाही सर्वसमावेशक राहत नाही. ती विशिष्ट गटाभोवती केंद्रीत होण्याचा धोका निर्माण होतो.ओळख-राजकारण हा आणखी एक महत्त्वाचा सामाजिक घटक आहे. जेव्हा राजकीय पक्ष विशिष्ट जातीय, धार्मिक किंवा सांस्कृतिक ओळखींवर आधारित समर्थन मिळवतात तेव्हा सामूहिक राष्ट्रीय हितापेक्षा गटहिताला प्राधान्य दिले जाते यामुळे धोरणनिर्मितीत पक्षपातीपणा वाढतो आणि सामाजिक विभाजन तीव्र होते. श्रीलंकेमध्ये सिंहली-तमिळ ओळखीवर आधारित राजकारणामुळे दीर्घकालीन संघर्ष निर्माण झाला तर युरोपमध्ये ब्रेक्झिट जनमत संग्रहात राष्ट्रीय ओळख हा प्रमुख मुद्दा ठरला. माहितीचा दुरुपयोगही लोकशाहीसाठी गंभीर आव्हान ठरतो. सोशल मीडियावरील खोटी किंवा दिशाभूल करणारी माहिती लोकमत चुकीच्या दिशेने वळवू शकते.ब्राझील आणि फ्रांस यांसारख्या देशांमध्ये निवडणुकांदरम्यान दिशाभूल व कमी मतदानाचा अनुभव दिसून आला आहे. नागरिकांचा सक्रिय सहभाग घटल्यास लोकशाही केवळ औपचारिक प्रक्रियेत मर्यादित राहते आणि तिची गुणवत्ता कमी होते

## ❖ आर्थिक कारणे: :-

लोकशाहीवरील लोकांचा विश्वास कमी होण्यामागे आर्थिक आणि राजकीय कारणांचा मोठा प्रभाव दिसून येतो. आर्थिक विषमता ही त्यातील प्रमुख समस्या आहे. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील वाढती दरी समाजात असंतोष निर्माण करते. जेव्हा संपत्ती व संसाधने काही मोजक्या लोकांच्या हाती केंद्रीत होतात तेव्हा सामान्य नागरिकांमध्ये लोकशाही ही फक्त श्रीमंतांच्या हितासाठी कार्य करते अशी भावना निर्माण होते. परिणामी लोकांचा शासनव्यवस्थेवरील विश्वास कमी होतो. बेरोजगारी व महागाई यांसारखी आर्थिक अस्थिरता देखील लोकशाहीविषयी नाराजी वाढवते. रोजगाराच्या संधी कमी झाल्यास आणि जीवनावश्यक वस्तूंच्या

किंमती वाढल्यास नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होते. आर्थिक ताण वाढल्यास सरकारच्या धोरणांवर टीका होते आणि राजकीय अस्थैर्य वाढू शकते. जागतिकीकरणाचाही काही समाजघटकांवर नकारात्मक परिणाम झाला आहे. जागतिक स्पर्धेमुळे स्थानिक उद्योग आणि पारंपरिक रोजगार कमी झाल्याने कामगार वर्गात असंतोष निर्माण झाला. उदा. अमेरिका आणि युरोप मध्ये औद्योगिक क्षेत्रातील बदलांमुळे काही भागांत राजकीय असंतोष वाढल्याचे विश्लेषण करण्यात आले आहे.

❖ **राजकीय कारणे:-**

राजकीय कारणांमध्ये भ्रष्टाचार हा लोकशाहीसाठी गंभीर धोका आहे. पारदर्शकतेचा अभाव, सत्तेचा गैरवापर आणि अपारदर्शक निर्णयप्रक्रिया यामुळे नागरिकांचा विश्वास ढासळतो. सत्तेचे केंद्रीकरण झाल्यास संसद न्यायव्यवस्था आणि स्वतंत्र संस्था यांचे महत्त्व कमी होते आणि नियंत्रण व संतुलनाची यंत्रणा कमकुवत होते. परंतु दीर्घकालीन राष्ट्रीय हित दुर्लक्षित राहते. न्यायव्यवस्थेची स्वायत्तता कमी झाल्यास "नियंत्रण आणि संतुलन व्यवस्था" प्रणाली ढासळते आणि लोकशाही असमतोल बनते. अशा सर्व घटकांमुळे लोकशाहीची गुणवत्ता व लोकशाहीवरील लोकांचा विश्वास दोन्ही कमी होताना आपल्याला दिसून येतो.

❖ **मानवी हक्काचे उल्लंघन:-**

मानवी हक्कांचे उल्लंघन हे लोकशाहीच्या गुणवत्तेला गंभीरपणे बाधा आणणारे घटक आहे. लोकशाही ही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित नसून ती अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समानता, न्याय, संघटन स्वातंत्र्य आणि कायद्याचे राज्य या मूलभूत मूल्यांवर आधारलेली असते. त्यामुळे कोणत्याही देशातील लोकशाहीची गुणवत्ता मोजताना मानवी हक्कांचे संरक्षण हा अत्यंत महत्त्वाचा निकष मानला जातो. जेव्हा हे हक्क मर्यादित केले जातात किंवा त्यांचे उल्लंघन होते तेव्हा लोकशाहीची रचना, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व कमकुवत होतात. कायद्याच्या राज्याचा ऱ्हास हा मानवी हक्कांच्या उल्लंघनाचा प्रमुख परिणाम आहे. "कायद्याचे राज्य" म्हणजे सर्व नागरिक आणि संस्था कायद्यापुढे समान असणे परंतु अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संघटन स्वातंत्र्य किंवा शांततामय आंदोलनाचा अधिकार मर्यादित केल्यास लोकशाहीच्या मूलभूत हक्काना धक्का बसतो. उदा. म्यानमार मध्ये लष्करी सत्तापालटानंतर आंदोलनांवर निर्बंध घालण्यात आले आणि विरोधी मतांवर कारवाई करण्यात आली. यामुळे लोकशाही प्रक्रिया खंडित झाली आणि नागरिकांचा शासनावरील विश्वास कमी झाला.

माध्यम स्वातंत्र्यावर मर्यादा आणणे हा लोकशाहीला कमकुवत करणारा आणखी एक घटक आहे. स्वतंत्र माध्यमे सत्ताधाऱ्यांवर नियंत्रण ठेवतात आणि जनतेपर्यंत वस्तुनिष्ठ माहिती पोहोचवतात. परंतु पत्रकारांवर दबाव, धमक्या दिल्यास पारदर्शकता कमी होते. उदा. रशिया मध्ये स्वतंत्र माध्यमांवर निर्बंध आल्यामुळे सरकारविषयी टीका मर्यादित झाल्याचे विविध आंतरराष्ट्रीय अहवालांत नमूद करण्यात आले आहे. माध्यम स्वातंत्र्य कमी झाल्यास नागरिकांना योग्य माहिती मिळत नाही आणि सुजाण निर्णय घेणे कठीण होते.न्यायप्रवेशात अडथळे निर्माण झाल्यास लोकशाहीतील "नियंत्रण व संतुलन" व्यवस्था ढासळते. न्यायव्यवस्था स्वतंत्र आणि प्रभावी नसल्यास नागरिकांचा शासनावरील विश्वास कमी होतो. अफगाणिस्थान मध्ये न्यायव्यवस्थेतील अस्थिरतेमुळे नागरिकांना न्यायप्रवेश कठीण झाला ज्याचा परिणाम लोकशाही संस्थांवर झाला. याशिवाय दडपशाहीमुळे भीतीचे वातावरण निर्माण होते. नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य नसल्यास ते राजकीय सहभाग टाळतात आणि लोकशाही केवळ नावापुरती उरते. उत्तर कोरिया मध्ये राजकीय स्वातंत्र्यांवर कठोर मर्यादा असल्याने लोकशाही अस्तित्वात नसल्याचे मानले जाते.

❖ **हवामान बदल आणि लोकशाहीची धोरणनिर्मिती :-**

हवामान बदल हा आजच्या काळातील जागतिक आणि सामाजिक समस्यांपैकी सर्वात गंभीर आव्हान मानला जातो. तो फक्त पर्यावरणीय समस्या नाही तर आर्थिक, सामाजिक आणि राजकीय स्थैर्यालाही प्रभावित करतो. हवामान बदलामुळे असलेल्या संकटांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी धोरणनिर्मिती अत्यंत महत्त्वाची ठरते आणि यामध्ये लोकशाही प्रणालीची भूमिका महत्त्वपूर्ण असते. लोकशाहीत निर्णय प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग, पारदर्शकता आणि सत्तांमध्ये संतुलन असल्यामुळे हवामान धोरणांची प्रभावी अंमलबजावणी होऊ शकते

लोकशाहीत धोरणनिर्मिती ही बहुसंख्याक, पारदर्शक आणि समावेशक प्रक्रिया असते. नागरिक, शास्त्रज्ञ, सामाजिक संघटना आणि उद्योग क्षेत्र यांचा सहभाग घेतल्यास हवामान बदलावर आधारित धोरणे अधिक वैज्ञानिक आणि व्यापक स्वरूपाची बनतात. उदा. जर्मनी मध्ये लोकशाही प्रक्रियेत विज्ञान, नागरिक समूह आणि स्थानिक प्रशासन यांचा समन्वय करून उर्जा बचत आणि

नवीनीकरणीय उर्जा धोरणे यशस्वीरित्या राबवली जातात. यामुळे प्रदूषण कमी झाले असून पर्यावरणीय स्थैर्य टिकवले गेले आहे.परंतु, हवामान बदलावर धोरणनिर्मितीत काही आव्हाने ही लोकशाही प्रक्रियेशी जोडलेली आहेत. बहुजन हित साधताना तात्कालिक आर्थिक आणि सामाजिक दबावामुळे दीर्घकालीन पर्यावरणीय धोरणांना मागे ठेवावे लागू शकते. उदा.अमेरिके मध्ये काही राज्यांमध्ये जलवायू धोरणांविषयी निर्णय घेताना आर्थिक लाभ व रोजगाराच्या तात्कालिक गरजांमुळे पर्यावरणीय धोरणांचा प्रत्यक्ष अंमल कमी झाला आहे.

लोकशाहीमध्ये मीडिया, नागरी समाज आणि सार्वजनिक चर्चेच्या माध्यमातून धोरणांची मागणी आणि प्रभाव तपासला जातो. हवामान धोरणांचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहचवणे, जागरूकता निर्माण करणे आणि धोरणांमध्ये सहभागी करणे या सर्व गोष्टींमुळे धोरण अधिक प्रभावी होते. उदा. भारतामध्ये काही राज्यांनी सार्वजनिक सहभाग व स्थानिक समुदायांसह समन्वय साधून जलसंधारण आणि कचरा व्यवस्थापनाचे धोरण यशस्वीपणे राबवले आहे. यावरून स्पष्ट होते की हवामान बदल आणि लोकशाही धोरणनिर्मिती यांचा संबंध अतिशय जवळचा आहे. लोकशाहीत समावेशकता, पारदर्शकता आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग असल्यास हवामान बदलावर आधारित धोरणे अधिक परिणामकारक, दीर्घकालीन आणि टिकाऊ ठरतात. उलट लोकशाहीत पारदर्शकता व सहभाग नसेल किंवा तात्कालिक आर्थिक दबाव जास्त असेल तर हवामान धोरणे प्रभावहीन ठरतात. एकंदरीत हवामान बदलावरील धोरणनिर्मितीसाठी मजबूत लोकशाही व्यवस्था हे अपरिहार्य घटक आहेत, कारण ते सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय स्थैर्य राखण्यास मदत करतात

### ❖ संशोधन पद्धती :-

हा संशोधन लेख गुणात्मक (Qualitative) पद्धतीवर आधारित आहे. विषयाच्या व्यापक स्वरूपामुळे विविध सैद्धांतिक आणि तुलनात्मक दृष्टिकोनांचा वापर करण्यात आला आहे.

**१) दुय्यम स्रोतांचा वापर** :

या संशोधनासाठी आंतरराष्ट्रीय संस्थांचे अहवाल, शैक्षणिक ग्रंथ, संशोधन लेख आणि धोरणपत्रे यांचा अभ्यास करण्यात आला आहे. विशेषतः United Nations चे मानवी हक्क अहवाल, Intergovernmental Panel on Climate Change (IPCC) चे हवामानविषयक अहवाल याचा संदर्भ घेण्यात आला आहे.

**२) तुलनात्मक विश्लेषण** : विविध देशांतील लोकशाहीची स्थिती, सामाजिक-आर्थिक धोरणे आणि मानवी हक्कांचे संरक्षण यांची तुलना करून साम्य व भिन्नता स्पष्ट करण्यात आली आहे. उदाहरणार्थ, भारत, अमेरिका, युरोप यांसारख्या देशांतील धोरणात्मक उपायांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे.

**३) सैद्धांतिक चौकट**

लोकशाहीविषयक तत्त्वज्ञानासाठी रॉबर्ट डहाल यांच्या लोकशाही संकल्पना आणि विकासविषयक दृष्टिकोनासाठी अमर्त्य सेन यांच्या विचारांचा आधार घेण्यात आला आहे. या चौकटीच्या साहाय्याने लोकशाहीच्या गुणवत्तेचे विश्लेषण करण्यात आले आहे.

### ❖ लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी पुढील उपाय महत्त्वाचे ठरतात

1. पारदर्शक आणि जबाबदार शासनव्यवस्था
2. आर्थिक समता आणि समावेशक विकास
3. नागरिक शिक्षण आणि डिजिटल साक्षरता
4. आंतरराष्ट्रीय सहकार्याद्वारे लोकशाही मूल्यांचे संरक्षण

### ❖ निष्कर्ष:-

लोकशाही व्यवस्थेसमोरील समकालीन जागतिक आव्हाने ही गंभीर आणि गुंतागुंतीची आहेत. लोकप्रियतेतील घट, मानवी हक्कांचे उल्लंघन, स्थलांतराचे प्रश्न आणि हवामान बदल यामुळे लोकशाहीची गुणवत्ता आणि स्थैर्य धोक्यात येऊ शकते. तथापि योग्य धोरणे, जागरूक नागरिक आणि सशक्त संस्था यांच्या साहाय्याने लोकशाही अधिक मजबूत केली जाऊ शकते. **लोकशाही ही स्थिर प्रणाली नसून सतत विकसित होणारी प्रक्रिया आहे.** तिचे संरक्षण आणि बळकटीकरण हे केवळ शासनाचे नव्हे तर नागरिकांचेही सामूहिक कर्तव्य आहे.

### ❖ संदर्भसूची :-


- देवळांकर शैलेन्द्र, समकालीन जागतिक राजकारण (शीतयुद्धोत्तर प्रश्न) विद्या बुक्स पब्लिशर्स तिसरी आवृत्ती, सप्टेंबर २०११
- देवळांकर शैलेन्द्र **संयुक्त राष्ट्र संघटना** विद्या बुक्स पब्लिशर्स
- देवळांकर शैलेन्द्र, समकालीन जागतिक राजकारण भारताच्या परराष्ट्र आणि संरक्षण धोरणापुढील आव्हाने, विद्या बुक्स पब्लिशर्स, पहिली आवृत्ती, सप्टेंबर २०१४
- अरुणा पेंडसे आणि उत्तरा सहस्त्रबुद्धे, आंतरराष्ट्रीय संबंध: शीतयुद्धोत्तर आणि जागतिकीकरणाचे राजकारण.
- Dahl, Robert A. – On Democracy
- Amartya Sen – Development as Freedom
- UN Human Rights Reports (**Online Resources**)
- Intergovernmental Panel on Climate Change (IPCC) Reports (**Online Resources**)